# प्रसिद्धिपत्रक

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

जा.क्र./पोउआ/वाह/ ५७०३/२०२४ पुणे                                                   दिनांक - १६/०८/२०२४

## सर्व वाहतुक विभाग पुणे शहर अंतर्गत

दि.१७/०८/२०२४ रोजी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य हे " मुख्यमंत्री - माझी लाडकी बहिण योजनेचा" उद्घाटन कार्यक्रमास बालेवाडी येथे उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन कार्यक्रमासाठी मा. उप मुख्यमंत्री महा. राज्य, व मोठया संखेने कार्यकर्ते व जनसमुदाय उपस्थित राहणार असल्याने बालेवाडी स्टेडिअम परिसरात वाहतुक कोंडी होण्याची शक्यता असल्याने वाहतुकी मध्ये खालील प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात बदल करण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमीत करत आहे.

**बाणेर रोड वरील वाहतुक अत्यावश्यक वेळी खालील प्रमाणे वळविण्यात येणार आहे.**

**१. विद्यापीठ चौकाकडुन बाणेर रोडने राधा चौकाकडे जाणाऱ्या वाहनांनी गणराज चौकामधुन डावीकडे वळण घेवुन किया शोरुम अंडरपास किंवा ननावरे अंडरपास मार्गे जावे.**

**२. मुंबई - बेंगलोर बायपास वरुन बाणेर रोडवरती जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांनी बालेवाडी जकातनाका येथुन डावीकडे वळण घेवुन हायस्ट्रिट मार्गे गणराज चौकामधुन इच्छित स्थळी जावे.**

**३. पुणे शहरा मधुन हिंजवडी, वाकड, लोणावळा, मुंबई कडे जाणाऱ्या वाहन चालकांना अवाहन करण्यात येते की , पुणे विद्यापीठ चौकामधुन बाणेर रोड मार्गे न जाता पाषाण रोड वरुन चांदणी चौक मार्गे जावे किंवा पुणे विद्यापीठ चौकामधुन औंध रोड मार्गे जावे**

**पुणे विद्यापीठ चौक ते चांदणी चौक – पाषाण रोड**

**पुणे विद्यापीठ चौक ते राधा चौक – बाणेर रोड**

**पुणे विद्यापीठ चौक ते राजींव गांधी पुल – औंध रोड**

**वरिल रस्त्यावर सर्व प्रकारच्या जड, अवजड वाहनांना दि. १७/०८/२०२४ रोजी ००.०१ वा. ते १७/०८/२०२४ चे २४.०० वा. पर्यंत प्रवेश बंद राहील**

**(अमोल झेंडे)**
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा पुणे शहर

**प्रति,**

**१)जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- **२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – ४,** पुणे शहर.
**३) पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
**४)सर्व प्रभारी अधिकारी वाहतुक विभाग, पुणे शहर.**
**२/- सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित यांना तात्काळ अदा करून,**

**यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**

**५)पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / व्टिटरवर अपलोड करावी.सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

**६)पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.